# VSchool: स्थानिक शिक्षकांसाठी मार्गदर्शन

प्रकल्प रचना समजून घ्या

१.

जिल्यातील विविध तज्ञ शिक्षक संबंधित विषय व पाठांचे स्वाध्याय तयार करतील



२.

ते स्वाध्याय योग्य ऑनलाइन स्वरुपात आणून, वोपा टीम VSchool वेबसाईटवर अपलोड करेल.










४.

स्थानिक शिक्षक विद्यार्थ्यांना विविध माध्यमातून शिकण्यास मदत करतील.

३.

विद्यार्थी स्मार्टफोनचा वापर करून अभ्यासाला सुरवात करतील.

# VSchool: स्थानिक शिक्षकांसाठी मार्गदर्शन

जबाबदारी क्र. १

---

१.

शिक्षकांनी आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांचा एक WhatsApp ग्रुप बनवावा. या ग्रुपवर केवळ विद्यार्थी व सर्व संबंधित विषय शिक्षक असतील.

- या ग्रुपद्वारे स्थानिक शिक्षकांनी VSchool वर दिलेल्या सूचनांप्रमाणे स्वाध्याय करण्याबाबत, गृहपाठाबाबत आठवड्याचे उद्दिष्ट ठरवायचे आहे, व त्यानुसार विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करायचे आहे. स्थानिक शिक्षक त्यात गरजेनुसार बदल करू शकतात.
- विद्यार्थी आपले गृहपाठ, स्वाध्यायात दिलेल्या कृती या ग्रुपवर टाकतील, संबंधित विषय शिक्षक  त्यांना प्रतिसाद देतील व स्वाध्यायाच्या नोंदी ठेवतील.
- शिक्षक विषयानुसार वार वाटून घेतील व शक्यतो त्या दिवशी आपल्या विषयाचे जास्त तास घेतील, व्हिडीओ कॉल घेतील.

२.

आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांच्या पालकांचा वेगळा WhatsApp ग्रुप बनवावा. या ग्रुपवर केवळ पालक व सर्व संबंधित विषय शिक्षक असतील.

- या ग्रुपवर सर्व विषय शिक्षकांनी, विद्यार्थ्यांनी केलेले गृहपाठ, स्वाध्याय इ. याबद्दल प्रत्येक आठवड्याच्या शेवटी केवळ संक्षिप्त अहवाल पाठवायचा आहे.
- संबंधित पालकांशी दुतर्फा सवांद होणे, विद्यार्थ्यांविषयी माहिती, प्रश्न, सूचना, इ. ची देवाण घेवाण होणे, केवळ यासाठी हा ग्रुप वापरायचा आहे.

३.

VSchool प्लॅटफॉर्म कसा वापरावा याबद्दल प्लॅटफॉर्मवरच सूचना दिल्या आहेत, डेमो व्हिडिओ दिले आहेत ते पाहून घ्यावेत

# VSchool: स्थानिक शिक्षकांसाठी मार्गदर्शन

**जबाबदारी क्र. २**

---

१.

शिक्षकांनी आपल्या वर्गातील विद्यार्थी स्वाध्याय करत आहेत का याच्या नोंदी ठेवायच्या आहेत. प्रत्येक आठवड्याच्या शेवटी या नोंदींचा गोषवारा जिल्हा परिषद / संबंधित संस्था यांना गुगल फॉर्म द्वारे व पालकांच्या WhatsApp ग्रुपवर पाठवायचा आहे.

उदा. मराठीचे शिक्षक आपल्या रजिस्टरमध्ये अशा प्रकारे नोंदी ठेवतील

| क्र | विद्यार्थ्याचे नाव | पाठ क्रमांक १ जय जय हे भारत देशा | | | | | पाठ क्रमांक २ बोलतो मराठी | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | स्वाध्याय १ | स्वाध्याय २ | स्वाध्याय ३ | स्वाध्याय ४ | स्वाध्याय ५ | स्वाध्याय १ | स्वाध्याय २ | स्वाध्याय ३ | स्वाध्याय ४ | स्वाध्याय ५ |
| १ | प्रफुल्ल शशिकांत | ✓ | ✓ | ✓ | | | | | | | |
| २ | आकाश भोर | ✓ | ✗ | ✓ | | | | | | | |
| ३ | ऋतुजा जेवे | ✓ | ✓ | ✗ | | | | | | | |
| ४ | अश्विन भोंडवे | ✗ | ✓ | ✗ | | | | | | | |
| ५ | प्रियंका सोनवणे | ✓ | ✗ | ✗ | | | | | | | |

२.

स्वाध्यायात काही सुधारणा सुचवायच्या असल्यास, योगदान द्यायचे असल्यास, किंवा इतर काही अडचण वा सूचना असल्यास contact.vschool@gmail.com या मेलवर संपर्क साधायचा आहे.

३. शाळेचा VSchool कोड म्हणजेच—शाळेचा **U-DISE code**

# VSchool: स्थानिक शिक्षकांसाठी मार्गदर्शन

जबाबदारी क्र. ३

१.
सर्वप्रथम शिक्षकांनी स्वतःच्या व आपल्या वर्गातील सर्व विद्यार्थ्यांच्या (पालकांच्या) मोबाईलमध्ये खालील ॲप्स इंस्टॉल करून घ्यावेत

1. Zoom
2. Any Pdf reader application
3. Any Office application
4. Google Meet
6. Diksha
7. YouTube
8. WhatsApp
9. Screen recorder - No ads by Kimcy929 or any similar app
10. Any Notes application
11. Gmail
12. Google chrome

## जि.प / संस्थेला सादर साप्ताहिक गोषवारा

१. विषय: ___

२. एकूण विद्यार्थी संख्या: ___

३. प्रती विद्यार्थी अपेक्षित स्वाध्याय संख्या: ___

४. प्रती विद्यार्थी प्रत्यक्ष झालेले स्वाध्याय सरासरी:___

४. सर्व विद्यार्थ्यांचे झालेले एकूण स्वाध्याय: ___

५. पाठानुसार झालेले स्वाध्याय

६. स्वत: आयोजित केलेले झूम कॉल्स

७. नोंदवहीचा फोटो

* सदर माहिती जि.प. ने / संस्थेने दिलेल्या गुगल फॉर्मद्वारे भरून पाठवायची आहे.